नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७३ Issue - 173 | वार बुधवार दि. १२ नोव्हेंबर २०२५ Blow- Wednesday Date 12 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सत्तेच्या चाव्या कुणाकडे? फैसला मतपेटीत बंद

## सर्वच एक्झिट पोलचे आकडेवारी जाहीर; बिहारमध्ये एनडीएचा बोलबाला, महागंठबंधन पुन्हा पिछाडीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्याचं मतदान संपलं आणि सत्तेच्या चाव्या कुणाकडे याचा फैसला मतपेठीत बंद झाला. १४ नोव्हेंबर रोजी याचा निकाल लागणार असून सगळ्याच पक्षांची, त्यांच्या उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. अशात आता एक्झिट पोलचे आकडे समोर आले आहेत. त्यामध्ये सर्वच एक्झिट पोलनी भाजप प्रणित एनडीएला स्पष्ट बहुमत मिळणार अशी शक्यता वर्तवली आहे. तर तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महागठबंधनला शंभरीही गाठता येणार नसल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बिहारच्या निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात ६४ टक्के तर दुसऱ्या टप्प्यात ६७.६६ टक्के इतकं मतदान झाल्याची माहिती आहे. एकूण किती मतदान झालं याची अधिकृत आकडेवारी अद्याप निवडणूक आयोगाने जाहीर केली नाही. पण गेल्या वेळच्या तुलनेत यंदा मतदानाच्या टक्केवारीमध्ये मोठी वाढ झाल्याचं दिसून येतंय. त्यामुळे त्याचा फटका कुणाला बसणार हे आता १४ नोव्हेंबर रोजीच स्पष्ट होणार आहे.

चढठखनए-खछड पोलनुसार, भाजपप्रणित एनडीएला सर्वाधिक जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

एनडीए - १४७-१६७
महागठबंधन - ७०-९०
इतर - २-६

चाणक्य एक्झिट पोलनुसार, महागठबंधन शंभर जागा पार करणार

चाणक्य एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, बिहारमध्ये पुन्हा एकदा भाजपप्रणित एनडीएला सत्ता मिळणार आहे. तर महागठबंधनला शंभरच्या आसपास जागा मिळणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.




एनडीए - १३०-१३८
महागठबंधन - १००-१०८
इतर - ३-५

पोल डायरीच्या अंदाजानुसार एनडीएची सत्ता, दोनशेपेक्षा जास्त जागा

पोल डायरीच्या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, बिहारमध्ये एनडीए दोनशेच्या पारही जाऊ शकते. तर तेजस्वी यादव यांच्या महागठबंधनला ३२ ते ४९ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

एनडीए - १८४-२०९
महागठबंधन - ३२-४९
इतर - १-५

प्रजा पोलनुसार एनडीएला पूर्ण बहुमत

प्रजा पोलच्या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, एनडीएला १८६ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर महागठबंधनला ५० जागा मिळण्याची शक्यता आहे.

एनडीए - १८६
महागठबंधन - ५०
इतर - ७

पोलस्ट्राटनुसार एनडीएला स्पष्ट बहुमत, महागठबंधनला मोठा धक्का

पोलस्ट्राटच्या अंदाजानुसार, एनडीएला पूर्ण बहुमत मिळणार असून १३३ ते १४८ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

एनडीए - १३३-१४८
महागठबंधन - ८७-१०२
इतर - ३-५

टीआयएफ रीसर्चनुसार, बिहारमध्ये भाजप-एनडीए दीडशे पार

टीआयएफ रीसर्च एक्झिट पोलनुसार, भाजप प्रणित एनडीएला दीडशेहून जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे. एनडीएला १४५ ते १६३ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर महागठबंधनला ७६ ते ९५ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

एनडीए - १४५-१६३
महागठबंधन - ७६-९५
इतर - ०-१

बिहारमध्ये एनडीए दीडशे जागा जिंकणार

जेव्हीसी एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, एनडीए १३५ ते १५० जागा जिंकण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर महागठबंधन शंभरच्या आसपास जागा जिंकू शकते असं म्हटलं आहे.

एनडीए - १३५-१५०
महागठबंधन - ८८-१०३
इतर - ३-६

एनडीएची पावणे दोनशे जागांकडे वाटचाल : बिहारमध्ये आतापर्यंत अनेक पोल समोर आले आहेत. सर्वच पोलच्या आकडेवारीनुसार, बिहारमध्ये सत्तेची चावी पुन्हा एकदा भाजपप्रणित एनडीएकडे जाण्याची शक्यता आहे. त्यानुसार, बिहारमध्ये एनडीए १५० ते १७० जागा जिंकण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर महागठबंधनला फक्त ६८ ते ८० जागा जिंकता येतील अशी शक्यता आहे. इतरांना दोन ते सहा जागा मिळतील. त्यामध्ये प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाला दोन ते सहा जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

एनडीए - १५०-१७०
महागठबंधन - ६८-८०
इतर - २-६

# ५ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवला : राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य मंत्रिमंडळ बैठकीत आज महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, ५ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज कॅबिनेटची मंत्रिमंडळ बैठक संपन्न झाली. त्यामध्ये, ५ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सहकारी, विधि व न्याय, वित्त विभाग आणि जलसंपदा विभागासाठी २ असे एकूण ५ निर्णय घेण्यात आले.

(सहकार विभाग) : नाशिक, नागपूर व धाराशिव या जिल्हा मध्यवती सहकारी बँकांना ८२७ कोटी रुपयांचे शासकीय भागभांडवल

(विधि व न्याय विभाग) : न्यायालयीन संकुले तसेच न्यायाधिशांची निवासस्थाने यांच्या सुरक्षेत वाढ. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांच्याकडून अतिरिक्त सुरक्षारक्षक उपलब्ध करून घेण्यास व त्याकरिता खर्च तरतुदीस मान्यता



(वित्त विभाग) - पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढविण्यास मान्यता. अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार

(जलसंपदा विभाग) : हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता

(जलसंपदा विभाग) : हिंगोली जिल्ह्यातील सुकळी साठवण तलाव (ता. सेनगाव) प्रकल्पासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांच्या तरतुदीस मंजुरी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबई येथे पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर या ज्योतिर्लिंगांच्या विकासासंदर्भात सादरीकरण बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील भाविक नियमितपणे ज्योतिर्लिंगांच्या दर्शनासाठी येतात, हे लक्षात घेऊन श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगांचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरात सुरू असलेली विकासकामे गतीने पूर्ण करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## मुंबई, पुणे, मराठवाडा, विदर्भात तापमानात लक्षणीय घट

# राज्यात थंडी वाढली; कमाल तापमानात घट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पश्चिम मध्य प्रदेशामध्ये निर्माण झालेली तीव्र शीतलहर, राज्यात उत्तर ते ईशान्य पट्ट्यातून वाहणारे वारे यामुळे राज्यातील किमान तापमानावर परिणाम होत असून कोकण विभागात गारवा जाणवत आहे, तर उर्वरित राज्यात थंडीचा कडाका जाणवायला सुरुवात झाली आहे. किमान तापमान मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा तीन ते चार अंश, मराठवाड्यात चार ते पाच अंश, तर विदर्भात सहा अंशांपर्यंत खाली उतरले आहे. कोकणातही किमान तापमानाचा पारा उतरला असून मुंबईत सांताक्रूझ येथे सोमवारी सकाळी किमान तापमान १९ अंशांपर्यंत खाली उतरले होते. राज्यात कमाल तापमानही सरासरीहून कमी नोंदवले जात आहे.



राज्यात सोमवारी सर्वांत कमी किमान तापमान अहिल्यानगरजवळील जेऊर येथे नऊ अंश सेल्सिअस नोंदले गेले. जळगाव येथे ९.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. नाशिकमध्ये १०.८ अंश तर अहिल्यानगर येथे ११.३ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. महाबळेश्वरचा पारा १२.३ अंश से. नोंदला गेला. राजस्थानमधील शीतलहरीमुळे सोमवारी उत्तर मध्य महाराष्ट्राच्या तापमानावर परिणाम झालेला दिसला, तर विदर्भामध्ये पुढील दोन दिवस किमान तापमान आणखी खाली येईल असा अंदाज आहे. विदर्भामध्ये सोमवारी अनेक केंद्रांवर १२ ते १३ अंशांदरम्यान किमान तापमान होते. गोंदिया येथे किमान तापमानाचा पारा १०.४ अंश सेल्सिअस होता. विदर्भात सर्वदूर किमान तापमान १५ अंशांच्या खाली असून हे तापमान सरासरीपेक्षा चार ते सहा अंशांनी कमी आहे. सर्वाधिक फरक गोंदिया येथे असून हे तापमान सरासरीपेक्षा ६.७ अंशांनी कमी होते. यवतमाळ येथे ५.८, बुलडाणा येथे ५.५, वाशिम येथे ५.१ असा फरक सरासरी आणि सोमवारच्या किमान तापमानात नोंदला गेला. मराठवाड्यातही किमान तापमानाचा पारा उतरलेला असून छत्रपती संभाजीनगर येथे ११.८ तर बीड येथे ११.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

कमाल तापमानाचाही पारा हळूहळू उतरत आहे. राज्यभरातील कमाल तापमानात सरासरीपेक्षा खूप फरक नाही. मात्र कोकण वगळता उर्वरित राज्यात ३० अंशांखाली कमाल तापमान उतरल्याने उन्हाच्या तडाख्यापासून दिलासा मिळत आहे. कोकण विभागात मात्र कमाल तापमान ३० अंशांच्या वर नोंदले जात आहे. कुलाबा येथे ३२, तर सांताक्रूझ येथे ३२.६ अंश सेल्सिअस, डहाणू येथे ३१.९ अंश सेल्सिअस कमाल तापमान सोमवारी नोंदले गेले. या तुलनेत किमान तापमान डहाणू, रत्नागिरी केंद्रांवर तीन किंवा अधिक अंशांनी कमी झाले होते. डहाणू येथे किमान तापमान सरासरीहून ३.६, तर रत्नागिरी येथे ३.७ अंशांनी कमी नोंदले गेले. सांताक्रूझ येथेही किमान तापमान तीन अंशांनी खाली उतरून १९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

# दिल्ली बॉम्बस्फोट, पोलिसांकडून फरीदाबाद मॉड्यूलचा पर्दाफाश, मास्टरमाईंडचे कनेक्शन उघड?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाच्या काही तास आधी हरियाणा आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी फरीदाबादमधील एका मोठ्या दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला. या मॉड्यूलमध्ये अनेक डॉक्टर सामील असल्याने याला 'व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूल' असेही म्हटले जात आहे. आता समोर आलेल्या माहितीनुसार, या फरीदाबाद मॉड्यूलचा खरा सूत्रधार मौलवी इरफान अहमद आहे, जो जम्मू-काश्मीरमधील रहिवासी आहे.मीडिया रिपोर्टनुसार, फरीदाबाद दहशतवादी मॉड्यूलमध्ये सामील असलेल्या सर्व डॉक्टरांना मौलवी इरफाननेच कट्टरपंथी बनवले होते. रिपोर्टमध्ये गुप्तचर सूत्रांनी सांगितले की, 'मौलवी इरफान अहमदने वैद्यकीय विद्यार्थ्यांना कट्टरपंथी बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तो श्रीनगरमधील गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये पॅरामेडिकल म्हणून काम करत होता आणि सर्व विद्यार्थ्यांच्या संपर्कात होता. तो नौगाम मशिदीचा इमामही होता.'




रिपोर्टमध्ये सूत्रांच्या हवाल्याने असे सांगण्यात आले आहे की, मौलवी इरफानने फरीदाबादमधील वैद्यकीय विद्यार्थ्यांना कट्टरपंथी बनवण्यासाठी काम केले. त्यांच्या मते, 'तो जैश-ए-मोहम्मद पासून प्रेरित होता आणि विद्यार्थ्यांना त्याचे व्हिडिओ दाखवत असे. तो अफगाणिस्तानमधील कोणाशी तरी तजखझ (व्हॉइस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉल) वर बोलत असे.' माहितीनुसार, त्याचे काम विद्यार्थ्यांना कट्टर बनवणे हे होते आणि डॉक्टर मुजम्मिल शकील आणि डॉक्टर मोहम्मद उमर हे इरफानचे हे काम पुढे नेत होते. सूत्रांनी सांगितले की, 'शाहीन फक्त मदत करत होती, पण मुख्य सूत्रधार इरफानच होता.'

मौलवी इरफान अहमदने टेलिग्राम आणि श्रीमा वर अनेक अकाउंट्स बनवले होते. याच माध्यमातून तो जैश-ए-मोहम्मद चा प्रचार करत असे. सूत्रांनुसार, 'त्याने अफगाण युद्धाच्या काळातील काही उपदेश निवडक विद्यार्थ्यांना दाखवले होते.' तपासकर्त्यांना संशय आहे की त्याला अफगाणिस्तामधून एखाद्या हँडलरकडून वैचारिक आणि तोंडी सूचना मिळत होत्या.

ज्याला आता फरीदाबाद मॉड्यूल म्हटले जात आहे, त्याची चौकशी २७ ऑक्टोबर रोजी श्रीनगरच्या नौगाममध्ये जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ लावलेल्या पोस्टर्समुळे सुरू झाली होती. या प्रकरणात सुरुवातीला तीन ग्राऊंड वर्कर पकडले गेले होते, जे एकेकाळी श्रीनगरमध्ये दगडफेक करण्याचे काम करत होते. त्यांनीच पोलिसांना मौलवी इरफान अहमदपर्यंत पोहोचवले. मौलवीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी डॉ. अदील अहमद राथर आणि जमीर अहनगर यांना अटक केली. हे दोघेही इरफानचेच साथीदार होते.

चौकशीच्या आधारे जम्मू-काश्मीर पोलिसांनी डॉ. मुजम्मिल शकीलपर्यंत पोहोचले. हा मौलवीच्या खोलीतूनच आपल्या कारवाया करत होता. मुजम्मिल फरीदाबादमधील धौज येथील अल फलाह युनिव्हर्सिटीमध्ये काम करतो. मौलवीचे संबंध दिल्ली बॉम्बस्फोटांसाठी जबाबदार मानल्या जाणाऱ्या डॉ. मोहम्मद उमरशीहीहि जोडलेले होते. असे सांगितले जात आहे की फरीदाबाद मॉड्यूलचा पर्दाफाश झाल्यानंतर घाबरून त्याने ही घटना घडवून आणली. तर उत्तर प्रदेशातील महिला डॉक्टर शाहीन सईद फरीदाबाद मॉड्यूलची फायनान्सर आणि मदतनीस म्हणून समोर येत आहे. गुप्तचर सूत्रांनुसार, शाहीन उमरच्या संपर्कात अल फलाह युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेत असतानाच आली होती, जिथे हा मौलवी खूप सक्रिय होता.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक



प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.
फक्त आमच्याकडेच



मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### पर्दाफाश

लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाच्या काही तास आधी हरियाणा आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी फरीदाबादमधील एका मोठ्या दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला. या मॉड्यूलमध्ये अनेक डॉक्टर सामील असल्याने याला 'व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूल' असेही म्हटले जात आहे. आता समोर आलेल्या माहितीनुसार, या फरीदाबाद मॉड्यूलचा खरा सूत्रधार मौलवी इरफान अहमद आहे, जो जम्मू-काश्मीरमधील रहिवासी आहे.मीडिया रिपोर्टनुसार, फरीदाबाद दहशतवादी मॉड्यूलमध्ये सामील असलेल्या सर्व डॉक्टरांना मौलवी इरफाननेच कट्टरपंथी बनवले होते. रिपोर्टमध्ये गुप्तचर सूत्रांनी सांगितले की, 'मौलवी इरफान अहमदने वैद्यकीय विद्यार्थ्यांना कट्टरपंथी बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तो श्रीनगरमधील गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये पॅरामेडिकल म्हणून काम करत होता आणि सर्व विद्यार्थ्यांच्या संपर्कात होता. तो नौगाम मशिदीचा इमाम ही होता.' रिपोर्टमध्ये सूत्रांच्या हवाल्याने असे सांगण्यात आले आहे की, मौलवी इरफानने फरीदाबादमधील वैद्यकीय विद्यार्थ्यांना कट्टरपंथी बनवण्यासाठी काम केले. त्यांच्या मते, 'तो जैश-ए-मोहम्मद पासून प्रेरित होता आणि विद्यार्थ्यांना त्याचे व्हिडिओ दाखवत असे. तो अफगाणिस्तानमधील कोणाशी तरी तजखझ (व्हॉइस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉल) वर बोलत असे.' माहितीनुसार, त्याचे काम विद्यार्थ्यांना कट्टर बनवणे हे होते आणि डॉक्टर मुजम्मिल शकील आणि डॉक्टर मोहम्मद उमर हे इरफानचे हे काम पुढे नेत होते.

# कालकथित अविनाश डोळस यांना विनम्र अभिवादन....!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आंबेडकर चळवळीतील अग्रणी प्रा. अविनाश डोळस यांचे ११ नोव्हेंबर २०१८ रोजी निधन झाले.

आज त्यांचा सातवा स्मृति दिन आहे.

काही लोक येतात आणि जातात. काही स्मृती ठेऊन जातात. त्यांच वैचारिक योगदान असते. हे खरे आहे. सर्वांची आठवण रहात नाही. काहींच्या रहातात. त्यापैकीच अविनाश डोळस एकमाद्वितय व्यक्तीमत्व.

फोटोकडे पाहिल्यानंतर विश्वास बसत नाही. आजही चळवळीत काम करत आहेत असे वाटते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व प्रकाशन साधने या समितीचे सदस्य सचिव होते. त्याचें काळात अनेक प्रकाशनाचे काम झाले. प्राध्यापक अविनाश डोळस हे एक समाज सुधारक होते. आंबेडकरवादाची संकल्पना नीटपणे त्यांनी मांडणी केली. आपण कसे जगतो, आणि काळात जगत असल्याने बदल अटळ असतो. नव्या शक्यता समोर येत असतात. त्याला धैर्याने कसे सामोरे जायचे... या विषयाचे प्रशिक्षण ते कार्यकर्त्यांना देत असत. आंबेडकर विचार आणि कृती याचीं बांधीलकी मानत असत. सामाजिक बांधिलकी आपल्या आयुष्यात एक केवळ विचारसूत्र नव्हे तर एक आचार तत्व म्हणून त्याचे पालन करत असत. आंबेडकरवादाचे रुपांतर चळवळीत काम करताना कसे असायला हवे, याविषयीचे एक आयाम विकसित केले. चळवळीतले अध्वर्यू मानले जायचे. हिंदू धर्मातील जाती प्रथेच्या विरोधात त्यांनी जीवनभर लढा उभा केला चळवळ चालवली आंबेडकर चळवळीला एक नवे परिमाण देण्याचा प्रयत्न केला ते बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचे प्रशंसक होते. गौतम बुद्धाच्या विचारसरणीवर नितांत श्रद्धा होती. जगताना ते समग्र मानवी जीवनाचा विचार करण्याकडे अधिक विचार करत असताना दिसून येतात.

आंबेडकर चळवळीचे प्रख्यात विचारवंत व मार्गदर्शक म्हणून मोलाचे कार्य केले आहे. अतिशय बुद्धिवादी व मानवतावादी भुमिका घेऊन लेखनप्रवास केला. त्यांच्या लेखनातून डोळसयांनी अनेक विचारप्रणालींना गती दिली. 'आंबेडकर चळवळ : परिवर्तनाचे बदलते संदर्भ' हे पुस्तक



चळवळीला प्रचंड दिशा व मार्गदर्शन करणारे ठरले. आंबेडकरी चळवळीची बांधणी करण्यासाठी , प्रत्येक समाजाच्या ज्वलंत प्रश्नावर प्रकाश टाकून जागृती केली. एक नवा पर्याय लोकांसमोर देण्यासाठी प्रयत्न केला. मा. बाळासाहेब आंबेडकरासोबत पदोपदी योगदान दिले. बाळासाहेब आंबेडकरांनी सद्यस्थितीचे राजकिय प्रवाहाचे विश्लेषण व अविनाश डोळस यांची भुमिका समान असे. यापुढील काळात दोनच पर्याय असणार आहेत ते म्हणजे निधर्मवादी आणि ब्राम्हणी कर्मकांडवादी. प्रत्येक पक्ष धार्मिक बनत चालले आहेत. धर्म राजकारणाचा पाया होत आहे. त्यामुळे आंबेडकर चळवळ एका वळणावर येऊन ठेपली आहे त्यामुळे धर्म निरपेक्ष राष्ट्र कसे निर्माण कसे करता येइल यावर त्यांनी मूलगामी मार्गदर्शन केले. संस्कृति, धर्म, कायदा, राजकरण, व अर्थकारण याचे परस्पर संबंध लक्षात घेतल्याशिवाय तत्कालिन वास्तवाचे स्वरूप समजून घेणे तितकेच महत्वाचे आहे यावर डोळस यांनो मूलगामी विवेचन केले. परिस्थिती बदलत जाते आणि नव्या परिस्थितीत नवे प्रश्न, नवी आव्हाने समोर उभी राहातात. यावर ते आग्रही होते.

डोळस यांनी आपल्या ग्रंथातून, व्याख्याने, भाषणे, मोर्चे, सभा संमेलनातून जोरकसपणे व्यक्त होत असे. ते विसरता न येण्यासारखे आहे. देशात एक नवे चित्र उभे करण्यासाठी बाळासाहेबांना साथ दिली. नव्या आर्थिक धोरणात आपण कोठे आहोत... याचा गांभीर्याने विचार करण्यासाठी प्रबोधन करत राहिले. देशाचा भावी मार्ग निश्चत करण्यासाठी सातत्याने लेखन केले. वंचित घटकांना न्याय कसामिळेल यासाठी ते अस्वस्थ असत. दलित, पीडित, आदिवासी, महिला, आदि वंचित समूहांना त्याच्या राजकिय ताकदीची जाणिव करून देण्यासाठी त्यानी अविरत मेहनत घेतली हे वास्तव आहे.

माझे प्रत्येक ग्रंथलेखन करताना चर्चा व्हायची. बरेचसे वैचारीक मुद्दे लक्षात आणून द्यायचे. समाविष्ठ करायला सांगायचे. चळवळ स्वतंत्र कशी राहील आंबेडकरी चळवळीने परिवर्तनवादी समुहाचे व चळवळीचे नेतृत्व करावे. उपेक्षित, गरिब समुहाला आंबेडकर चळवळ हीच एकमेव आधार असणार आहे याचे भाकित अविनाश डोळस यांनी १९९० च्या दशकात भाकीत प्रतिपादन केले होते. पुन्हा नवे संदर्भ, नवे आयुधे, नववी दिशा शोधाव्या लागतील. नव्याने संघर्षाच्या मार्गाने चळवळीला जावे लागेल अशी भुमिका घेत व मांडणी करत.

स्मृतिशेष अविनाश डोळस यांना विनम्र अभिवादन.......!!!

**– डॉ. दत्तात्रय गायकवाड, पुणे**
**मो. ९८६०५९१३०५**

# श्री गुरु तेग बहादुर - 'हिंद दी चादर'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ – नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

एप्रिल १६२१ मध्ये अमृतसरमध्ये श्री गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरू हरगोबिंद आणि माता गुजरी यांच्या कुटुंबात झाला. १६६४ मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरु पदवी प्राप्त झाली होती. गुरू तेग बहादूर यांचे मूळ नाव त्यागमल होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना तेग बहादूर म्हणजेच तलवारीसारखा धैर्यवान हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा देत असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत, ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले. मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरूतेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२ मध्ये त्यांची ४०० वी जयंती देशभर साजरी केली होती. त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

'जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै,
सुख सनेहु अरू भय नहीं जा कै,
कांचन माटी मानै,
लोभ मोह अभिमान न ता कै, हरख सोग नहीं जा कै
जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै'

म्हणजेच जो मनुष्य दु:खात असला तरी दु:खी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत.

त्यांच्या शहीद समागमास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अल्पसंख्यांक विभाग आणि श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नुकत्याच या कार्यक्रमांच्या आयोजनानिमित्त कार्यशाळा घेण्यात आली होती. यावेळी 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब' यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेनिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले होते आणि हा कार्यक्रम जनमानसांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करीत आहे. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी आहे. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

# 'आपले सरकार सेवा केंद्र' नागरिकांच्या विश्वासाचे प्रतिक व्हावे : ॲड. आशिष शेलार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शासनाने सुरू केलेली 'आपले सरकार सेवा केंद्र' ही योजना नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवांचा सुलभ लाभ मिळवून देण्यासाठी आहे. त्यामुळे मुंबई उपनगरातील प्रत्येक सेवा केंद्र हे नागरिकांच्या विश्वासाचे प्रतीक व्हावे, अशी अपेक्षा माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगर पालकमंत्री ड. आशिष शेलार यांनी व्यक्त केली



आपले सरकार सेवा केंद्र वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपजिल्हाधिकारी सुभाष काकडे तसेच मुंबई उपनगरातील आपले सरकार सेवा केंद्र चालक उपस्थित होते.

पालक मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, आज जगभर माहिती तंत्रज्ञानाच्या नव्या युगात सायबर धोकेही वाढले आहेत. महाराष्ट्राचा सायबर सुरक्षा सेल सक्षम आहे, तरीही प्रत्येक सेवा केंद्राने जबाबदारीने काम करून नागरिकांची माहिती सुरक्षित ठेवावी. तंत्रज्ञानाचा वापर काळजीपूर्वक करावा.

२०१८ च्या शासन निर्णयानुसार २५ हजार लोकसंख्येच्या मागे एक सेवा केंद्र होते, आता ती संख्या वाढवून दोन केंद्रे करण्यात आली आहेत. या माध्यमातून नागरिकांना दाखले, प्रमाणपत्रे, नॉन-क्रीमीलेअर, अधिवास, उत्पन्न दाखला अशा एक हजारहून अधिक सेवांचा लाभ मिळतो. शासन कार्यालयात वारंवार फेऱ्या न मारता, नागरिकांना त्यांच्या परिसरातच सेवा मिळावी, हा या योजनेचा हेतू असल्याचेही पालकमंत्री ड शेलार यांनी सांगितले

महाराष्ट्र शासन लवकरच सेवा केंद्रांच्या ब्रँडिंगसाठी व्यावसायिक संस्थेशी करार करणार असून, केंद्रांच्या कामकाजात एकसंध आणि व्यावसायिकता आणली जाणार असल्याचे मंत्री ड.आशिष शेलार यांनी सांगितले. यावेळी मुंबई उपनगर जिल्ह्यातील २३८ सेवा केंद्रांना या कार्यक्रमात प्रमाणपत्रे देण्यात आली. यात ७ दिव्यांग व्यक्तींना तर एका तृतियपंथीयाचासुद्धा सहभाग आहे. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार म्हणाले की, आपले सरकार सेवा वितरण अधिक कार्यक्षम करण्यासाठी तांत्रिक सुधारणा राबविण्यात येत आहे. व्हॉट्सपद्वारे प्रमाणपत्र पाठविणे, अर्ज प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणे आणि सर्व 'आपले सरकार' तसेच आधार केंद्रांचे जिओ-टॅगिंग पूर्ण करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांना त्यांच्या जवळच्या सेवा केंद्राचे ठिकाण गुगल मॅप व व्हॉट्सप चॅटबॉटद्वारे सहजपणे कळू शकते.

जिल्हाधिकारी श्री.कटियार म्हणाले की, तहसील कार्यालयातील सेतू केंद्रांचे आधुनिकिकरण सुरू असून, जशी सुविधा पासपोर्ट कार्यालयात मिळते तशीच सुविधा नागरिकांना सेतू कार्यालयात मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. अंधेरी तालुक्यात प्रभागनिहाय ५४, बोरीवली तालुक्यात प्रभागनिहाय ६७ व कुर्ला तालुक्यात प्रभागनिहाय ११७ आपले सरकार सेवा केंद्राचा समावेश आहे.

उपजिल्हाधिकारी (संगांयो), राजेंद्र पाटोळे, उपविभागीय अधिकारी, प्रशांत ढगे, तहसीलदार, राजेंद्र जव्हाण, तहसीलदार अंधेरी, स्नेहलता स्वामी उपस्थित होते, तहसीलदार, राजेंद्र चव्हाण यांनी आभार मानले.

## श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास सादरीकरण बैठक

# भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा-सुविधा तयार करा : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील ज्योतिर्लिंगाना वर्षभर मोठ्या प्रमाणात भाविक भेट देतात हे लक्षात घेऊन श्री क्षेत्र भीमाशंकर, श्री क्षेत्र औंढा नागनाथ व श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचा सर्वसमावेशक विकास आराखडा असावा. मंदिर परिसरातील सुरू असलेली कामे गतीने करून प्रस्तावित कामांचे योग्य नियोजन करा. या परिसरात भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी अत्याधुनिक एकात्मिक सुरक्षाप्रणाली कार्यरत करून भाविकांसाठी उत्कृष्ट दर्जाच्या सेवा सुविधा तयार करण्यासाठी गतीने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थान येथे पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास सादरीकरणाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. बैठकीला मुख्य सचिव राजेश कुमार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग व्ही.राधा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांच्या सध्याच्या व भविष्यातील संख्येनुसार दर्शन रांगांचे नियोजन करावे, यात्रा, उत्सव कालावधी हे लक्षात घेऊन मंदिर परिसरात प्रतीक्षा कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, निवासाची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, परिसर साफसफाई करणे, माहिती फलक, पर्यटक स्वागत कक्ष, पार्किंग व्यवस्थापन, आपत्कालीन यंत्रणा, तिकीट कक्ष, आरोग्य सुविधा, उपहारगृह यासह पर्यटन वाढीला चालना देणारे उपक्रम या भागात प्रामुख्याने राबवा. स्थानिक नागरिक व प्रशासनाला विचारात घेऊन येथील कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था काटेकोर असावी यासाठी खबरदारी घेण्यात यावी. अत्याधुनिक यंत्रणा तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने एकात्मिक सुरक्षा प्रणाली विकसित करा, जेणेकरून तात्काळ आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत मिळेल. मंदिर व्यवस्थापनासाठी काटेकोर नियम असणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धन व रोजगार निर्मितीसाठी पर्यटन विभागानेही येथील प्रस्तावित कामे गतीने करावीत. आज सादर झालेल्या आराखड्यांना उच्चस्तरीय समितीच्या मंजूरीनंतर निधी मिळेल. पुरातत्व विभागाकडून घेण्यात येणाऱ्या मंजुरीसाठी केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबत एक स्वतंत्र बैठक आयोजित करावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

राज्यातील ज्योतिर्लिंगाच्या विकास आराखड्याची प्रभावी व तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त असलेले अधिकारी यांनी यावेळी विकास आराखड्यांचे सादरीकरण केले. पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकास आराखडा व श्री क्षेत्र भीमाशकर विकास आराखडा कुंभमेळा २०२७ चे सादरीकरण सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा, हिंगोली जिल्ह्यातील श्री क्षेत्र औंढा नागनाथचे सादरीकरण वित्त विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर विकास आराखडा सादरीकरण अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी यांनी केले.

या बैठकीला नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के. एच. गोविंदराज, विधि व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, वित्त विभागाच्या प्रधान सचिव रिचा बागला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, पर्यटन विभागाचे सचिव संजय खंदारे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज नाशिक – त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंग दूरदृश्यप्रणालीद्वारे नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकात पुलकंडवार, छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर इतर विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांची कार्यवाही सुरळीत सुरू

## कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे महामंडळाचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : अलीकडील काही दिवसांपासून मराठा समाजातील बेरोजगार युवकांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत महामंडळाचे कामकाज बंद झाले आहे, व्याज परतावा थांबविण्यात आला आहे अशा प्रकारच्या निराधार अफया काही व्यक्तींकडून सोशल मीडियासह विविध माध्यमातून पसरवल्या जात आहेत. या अफवांना कोणातेही तथ्य नसून, महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याचे काम वगळता इतर सर्व कामकाज सुरळीतपणे सुरु असल्याचे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे. या अनुषंगाने खालील बाबी सर्वसामान्यांना कळविण्यात येत आहेत.

महामंडळाच्या कामकाजाबाबत वस्तुस्थिती –

■ जुलै २०२५ कालावधीत निर्माण झालेले LOI तपशील – १०८११, Bank Sanction संख्या – ४८०८, व्याज परतावा रक्कम – ३६,१२,५१,३२७/-

■ ऑगस्ट २०२५ कालावधीत निर्माण झालेले LOI तपशील – ८८१७, Bank Sanction संख्या – ४९९९, व्याज परतावा रक्कम – ११६,५९,९८,१९२/-

■ सप्टेंबर २०२५ कालावधीत निर्माण झालेले LOI तपशील – १३७३३, Bank Sanction संख्या – ४१०४, व्याज परतावा रक्कम – ६१,०९,९२,२१०/-

ऑक्टोबर २०२५ कालावधीत निर्माण झालेले LOI तपशील – १४२२, Bank Sanction संख्या – २३८४, व्याज परतावा रक्कम – ५०,३०,६७,७८२/-

■ ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत निर्माण झालेले ङजख तपशील – ––, Bank Sanction संख्या –११८७, व्याज परतावा रक्कम – ६,१६,४८,२९६/-

दि. १० ऑक्टोबर २०२५ पासून महामंडळाच्या वेब प्रणालीचे णसीर–वरींळेप चे काम हाती घेण्यात आले असून, त्यामागील प्रमुख कारणे खालीलप्रमाणे:

१. देव प्रणालीचे Security Audit प्रलंबित होते ते पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत, महामंडळाने स्वतः हुन LOI च Bank Sanction या दोन सेवा अधिसुचित केल्या आहेत. या नुसार या सेवा १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत देण्याचे बंधन महामंडळाने स्वतः वर घालून घेतले आहे. याबाबत आवश्यक ते बदल वेस प्रणालीमध्ये करणे सुरु आहे.

३. एजंटमार्फत लाभार्थ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबावी यासाठी म्हणून महामंडळाने CSC केंद्राद्वारे फक्त ७० रुपयांत सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी चजण केला आहे. त्या अनुषंगाने वेबप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे काम सुरु आहे.

४. लाभार्थ्यांना महामंडळाच्या सर्व सेवा थेट मोबाईलद्वारे देता याव्यात म्हणून Mobile App विकसित होत आहे. यासाठी वेबप्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणे सुरु आहे.

५. राज्यात विविध ठिकाणी एजंटमार्फत लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्याने, सद्यस्थितीत नाशिक व अहमदनगरमध्ये संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंद केले गेले आहेत. असे प्रकार घडू नयेत यासाठी वेब प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे काम सुरु आहे.

६. Nationalized Banks सोबत Bank API Integration सुरु असून, लाभार्थ्यांना सुरळीत व सहजपणे व्याज परतावा मिळणार आहे.

८. योजनांतर्गत काही असे व्यवसाय निदर्शनास आले आहेत की, त्यामधून अपेक्षित स्वयंरोजगारनिर्मिती होत नाही अशा व्यवसायांबाबतचा अंकेक्षणाबाबत योग्य निर्णय संचालक मंडळाच्या बैठकीत घेणे प्रस्तावित आहे, तसेच मराठा समाजातील युवकांसाठी नवीन व्यवसाय कसे निर्माण करता येऊ शकतील? ही बाब विचाराधीन आहे.

९. लाभार्थ्यांसाठी Online Webinars च्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम देखील सुरु करण्यात आले आहे.

१०. यापूर्वी व्याज परताव्याकामी लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ३ क्लेम सादर करता येत होते. मात्र सद्यस्थितीत लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ६ क्लेम सादर करता येत आहेत.

महामंडळ समाजाच्या उत्थानासाठी व शाश्वत आर्थिक विकासासाठी कटिबद्ध आहे. तरी कोणत्याही प्रकारच्या राजकीय, दिशाभूल करणाऱ्या किंवा अफवांवर आधारीत माहितीवर विश्वास ठेवू नये. महामंडळाचे सर्व कामकाज सुरु असून, वेब प्रणालीचे अद्ययावतीकरण हे समाजहिताचे व लाभार्थ्यांच्या सोयीसाठीचे असल्याचे पत्रकात नमूद आहे.

## सोलापूर पुणे महामार्गावर अरण गावाच्या समोर असलेल्या उड्डाणपुलावरून सिमेंट बलकर सर्व्हिस रस्त्यावर पलटी, चालक थोडक्यात बचावला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


सोलापूर : दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास सोलापूर पुणे महामार्गावर अरण गावासमोर असलेल्या उड्डाणपुलावरून शेडम वरुण मुंबई येथे भरधाव वेगाने जाणारा सिमेंट बलकर क्रमांक चक १२ तक्र ५०६१ वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने सिमेंट बलकर उड्डाणपुलावर सुरक्षेसाठी लावलेले लोखंडी कठडे तोडून उजव्या बाजूला सर्विस रस्त्यावर पलटी झाला असून या अपघातात कोणीही जखमी झाले नाही या अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल प्लाजा येथील ग्रस्तीपथक , रुग्णवाहिका पथक आणि मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राचे अधिकारी श्री किरण अवताडे (झडख) आणि त्यांचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून , सदर घटनेची माहिती टेंभूर्णी पोलिस स्टेशन येथील अपघात विभागाचे अधिकारी श्री. जगताप साहेब आणि श्री. सरडे साहेब यांना दिली असल्याची माहिती वरवडे टोल प्लाझा येथील ग्रस्तीपथकाचे प्रमुख श्री.अमर पाटील यांनी दिली आहे.

## दिव्यांग असूनही अथक प्रयत्न आणि आई-वडिलांच्या कष्टातून मिळवले यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील सावद या ग्रामीण भागातील प्रियंका जिजाबाई सुरेश जाधव हिने सी.ए. (चार्टर्ड अकाउंटंट) परीक्षा उत्तीर्ण होऊन संपूर्ण तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत भाजीपाला विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या आई-वडिलांची लाडकी लेक असलेल्या प्रियांकाने आपल्या मेहनतीने व चिकाटीने हे यश मिळवले आहे. दिव्यांग असलेली प्रियंका लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होती. दहावी आणि पदवी परीक्षेत उत्तम गुण मिळवत तिने बालपणापासून उराशी बाळगलेले 'सी.ए. बनण्याचे' स्वप्न अखेर सत्यात उतरवले आहे. तिचे वडील सुरेश जाधव हे गोडाऊनमध्ये साफसफाईचे काम करतात. आई शेतात भाजीपाला पिकवून व विक्री करून कुटुंबाचा सांभाळ करते. अशा कठीण परिस्थितीतही मुलीने सी.ए. परीक्षा उत्तीर्ण केल्याने संपूर्ण कुटुंबासह




गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सी. ए. झाल्याबद्दल प्रियंका जाधव हिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**माझ्या आईने शेतात दिवसभर उन्हात काम करून, भाजीपाला विकून मला शिकवले. वडिलांनी गोडाऊनमध्ये साफसफाईचे काम करत शिक्षणासाठी पाठिंबा दिला. त्यांच्या त्यागामुळेच मला सी.ए. परीक्षेत यश मिळाले. माझा विश्वास आहे की कोणत्याही दिव्यांग व्यक्तीने स्वतःला कमी समजू नये. आपल्यातही मोठं होण्याची क्षमता, जिद्द आणि सामर्थ्य आहे.**

**– सी.ए. प्रियंका जाधव)**

## 'अमृत दुर्गोत्सव २०२५'ला गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा बहुमान; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रमाणपत्र केले सुपुर्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे. संस्थेच्या 'अमृत दुर्गोत्सव २०२५' या उपक्रमाने 'मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम' या श्रेणीत गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदविला आहे. या विक्रमाचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र देऊन अमृत संस्थेला सन्मानित करण्यात आले. या विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे सुपुर्द करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या यशाबद्दल 'अमृत' संस्थेचे अभिनंदन केले. महाराष्ट्राची दुर्गसंस्कृती ही आपल्या इतिहासाचे प्रतीक आहे. 'अमृत दुर्गोत्सव' या उपक्रमाद्वारे नव्या पिढीला या ऐतिहासिक वारशाशी जोडण्याचे उल्लेखनीय कार्य अमृत संस्थेने केले आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

'अमृत दुर्गोत्सव २०२५' या उपक्रमाद्वारे युनेस्को मान्यताप्राप्त १२ ऐतिहासिक गड-दुर्गांच्या प्रतिकृतींसोबत सेल्फी काढून ते दुर्गोत्सवाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. महाराष्ट्रासह देशातील विविध राज्ये आणि इतर देशातील नागरिकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक नागरिकाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे डिजिटल अभिनंदनपत्र देण्यात आले.

## डिक्की तर्फे पुणे येथे जेम नोंदणी विषयक राज्यस्तरीय कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (डिक्की) आणि नॅशनल एससी-एसटी हब यांच्या संयुक्त विद्यमाने ऋशच् पोर्टल विषयक राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन द पूना क्लब सभागृहात करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे डउ-डढ उद्योजक, चडचए आणि स्टार्टअप्सना सरकारी खरेदी व्यवस्थेमध्ये सहभागी करून घेणे आणि जेम पोर्टल या डिजिटल प्लॅटफॉर्मवर त्यांचे ऑनबोर्डिंग करणे हा होता.




कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. अजित चव्हाण अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, ऋशच् यांनी या पोर्टल मुळे सरकारकडून करण्यात येणाऱ्या खरेदी व्यवस्थेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच या खरेदी व्यवस्थेमध्ये पारदर्शकता, सुलभता आणि उद्योजकतेस प्रोत्साहन देणे या तीनही बाबी हाताळल्या जातात हे सांगितले. नवनवीन संधीबाबत ते बोलताना एमएसएमई उद्योजक तसेच एससी - एसटी उद्योजकांसाठी निर्माण केलेल्या संधींबाबतही बोलले. या कार्यशाळेत श्री अमित पाटील ऋशच् ऋ्रलळश्र-ळीरीं, महाराष्ट्र यांनी नोंदणी प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी ऋशच् वर नोंदणीची प्रक्रिया, बोली लावण्याच्या पद्धती, तसेच प्रत्यक्ष सरकारी टेंडरिंगमधील तांत्रिक टप्प्यांची सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमात श्री. अंकुर बोरठाकूर (शाखा व्यवस्थापक, एनएसआयसी, श्री. रितेश रंगारी (प्रभारी, राष्ट्रीय एससी-एसटी हब, पुणे), श्री. संतोष कांबळे, अध्यक्ष पश्चिम भारत डिक्की, श्री. अविनाश जगताप, श्रीमती. सीमा कांबळे, डिक्की तसेच श्रीमती निवेदिता कांबळे, महिला विभाग महाराष्ट्र, श्री. ललित बन्सोड- अध्यक्ष पुणे डिक्की हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी ८० पेक्षा जास्त उद्योजकांना जेम पोर्टलवर स्वतःच्या व्यवसायाची नोंदणी करून घेतले. उद्योजक स्टार्टप्स यांचा या कार्यशाळेसाठी अतिशय भरघोस प्रतिसाद राहिला सरकारी योजनांच्या माध्यमातून नवउद्योजकांना डिजिटल व्यवसाय जगतात सशक्त करण्याच्या दिशेने एक प्रभावी पाऊल ठरले आहे

### कॉप्युक्स टेक्नॉलॉजी नालिटिक्स मुंबई यांच्याशी कौशल्य विकास केंद्राचा सामंजस्य करार

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना एआय शिकण्याची सुवर्णसंधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शिक्षण आणि नोकरीच्या बदलत्या गरजा आओळखून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांना भविष्याच्या तंत्रज्ञानासाठी सज्ज करण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील कौशल्य विकास केंद्र आणि कॉप्युक्स टेक्नॉलॉजी नालिटिक्स मुंबई या अग्रगण्य संस्थेमध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे.




या करारानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील आणि संलग्न महाविद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता या उदयोन्मुख क्षेत्रातील अत्यंत मागणी असलेले सर्टिफिकेट कोर्सेस शिकण्याची अमूल्य संधी उपलब्ध झाली आहे. जगातील प्रत्येक उद्योग आता डेटा आणि तंत्रज्ञानावर आधारित झाला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे या नवीन युगाचे केंद्रस्थान आहे. ऑटोमेशन, डेटा नालिसिस, निर्णय प्रक्रिया आणि अगदी कला-साहित्य निर्मितीपर्यंत एआयचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. या महत्त्वपूर्ण बदलाची गरज ओळखून, या सामंजस्य करारानुसार विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना एआय क्षेत्राती सर्टिफीकेट कोर्स इन मशिनलर्निंग, सर्टिफीकेट कोर्स इन जनेरेटिव्ह एआय, सर्टिफीकेट कोर्स इन डिपलर्निंग कोर्स शिकता येणार आहेत.

यावेळी कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे ध्येय केवळ परीक्षा घेणे आणि पदवी देणे इतकेच मर्यादित नाही, तर आमच्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये देणे हे आहे. आजचे युग हे एआयचे आहे. जिथे एआय आणि ऑटोमेशनचा बोलबाला आहे. कॉप्युक्स टेक्नॉलॉजी नालिटिक्स, मुंबई संस्थेशी करार करून विद्यार्थ्यांना एआयचे प्रशिक्षण देत आहोत. हे कोर्सेस सोलापूरच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य, रोजगार आणि उद्द्योजकता या त्रिसूत्रीवर आधारित भविष्याची गुरुकिल्ली ठरतील.

यावेळी कौशल्य विकस केंद्रांचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर म्हणाले, आज बाजारपेठेत केवळ पारंपारिक ज्ञान पुरेसे नाही. तुमच्या पदवीला एआय आणि डेटा सायन्ससारख्या आधुनिक कौशल्यांची जोड देणे अत्यावश्यक आहे. कॉप्युक्स टेक्नॉलॉजी सारखी संस्था या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत आहे आणि त्यांच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून हे कोर्स शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना प्रथमच मिळत आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एआय सर्टिफिकेट कोर्सेसमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधीकारी श्री

महादेव खराडे, विद्याधर कुलकर्णी, मयूर जव्हेरी , वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित जगताप, कायदा अधिकारी ॲड. जावेद खैरादी अमोल खंडागळे आदी उपस्थित होते.

## शिक्षक पात्रता परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध

मुंबई : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२५ चे प्रवेशपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या http://mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर १० नोव्हेंबर २०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्राची प्रिंट काढून घ्यावी, असे आवाहन परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेच्या आयोजनाची कार्यवाही सुरू असून, परीक्षेस प्रविष्ट परीक्षार्थ्यांचे प्रवेशपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या http://mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर १० नोव्हेंबर २०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्राची प्रिंट काढून घ्यावी. प्रवेशपत्र विहीत मुदतीत प्राप्त करून न घेतल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित परीक्षार्थ्यांची राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# सर्व यंत्रणांनी जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा व एका नगरपंचायतीची निवडणूक सुरळीतपणे पार पाडावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा; आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगरपरिषद व ४२ नगरपंचायती यांचा सदस्य व अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील अकरा नगरपरिषदा व एक नगरपंचायती यांचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. त्या निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषद नगरपंचायत निवडणूक विषयक कामकाज सुरळीतपणे पार पाडून निवडणूक यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व अन्य संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, जिल्हा सह आयुक्त योगेश डोके यांच्यासह सर्व संबंधित नगरपालिकेचे निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की जिल्ह्यातील अकरा नगरपरिषदा व एका पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेले सर्व जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांच्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारीची सविस्तर माहिती घ्यावी. राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना, पत्र, हँडबुक याप्रमाणे दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी व निवडणूक अत्यंत शांततामय वातावरणात व निर्भयपणे होतील यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचित केले आहे.

सर्व नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी सर्व संबंधित प्रांत अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी तहसीलदार यांनी संयुक्तपणे बैठका घ्याव्यात. यांतर्गत काम करताना लोकसभा, विधानसभा निवडणुकी प्रमाणे माहिती संकलित करावी. यामध्ये सर्व संबंधित अधिकारी व यंत्रणांना जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या वतीने आवश्यक त्या सूचना वेळोवेळी देण्यात येतील असेही श्री. आशीर्वाद यांनी सांगितले.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी महसूल संतोष कुमार देशमुख यांनी राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील ११ नगरपरिषद व एका नगरपंचायतीचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्याची माहिती देऊन त्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणांनी व या निवडणुका पार पाडण्यासाठी नियुक्ती केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी करावयाच्या कामकाजाची सविस्तरपणे माहिती दिली. तसेच लवकरच राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सह आयुक्त योगेश डोके यांनी बार्शी, अकलूज, मोहोळ, पंढरपूर, अक्कलकोट, कुर्डूवाडी, करमाळा, सांगोला, मंगळवेढा, मैंदर्गी व दुधनी या नगर परिषद तर अनगर नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका कार्यक्रम जाहीर झालेला असून या अंतर्गत १५२ प्रभागातून २८९ सदस्य निवडले जाणार तर यासाठी ४९९ मतदान केंद्र निर्माण केल्याचे सांगितले. याकरिता १२ निवडणूक निर्णय अधिकारी, १२ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आल्याचे सांगितले.

# स्प्रिंट फोर सी.इ. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्पाचे उद्घाटन उत्साहात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर इंटरनॅशनल प्लॅन्ड पेरेंटहूड फेडरेशन व ऑस्ट्रेलियन एड यांच्याकडून फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेला स्प्रिंट फोर सी.इ. २०२५ महाराष्ट्र पूर आपत्कालीन प्रकल्प मंजूर करण्यात आला. सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा आरोग्याअधिकारी डॉ. संतोष नवले व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया मुंबई मुख्यालयाचे स्प्रिंट फोर प्रकल्प व्यवस्थापक डॉ. अमित कीटूकले यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उदघाटन हॉटेल निसर्ग एक्झिक्युटीव्ह मध्ये मोठ्या उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान हे होते.

यावेळी जिल्हा अतिरिक्त जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. किशोर घाडगे, डॉ. मोहन शेगर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर जिल्हा अध्यक्ष डॉ. अविनाश खांडेकर, अक्कलकोट तालुका आरोग्याधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, मोहोळ तालुका आरोग्याधिकारी डॉ. अरुण पाथरूडकर, सिव्हिल हॉस्पिटल ए.आर.टी. विभाग वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस -वरेरकर, अक्कलकोट तालुका विस्तार अधिकारी महेश भोरे, एड्स नियंत्रण विभाग जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, भारतीय जैन संघटनेचे राज्य अध्यक्ष केतन शहा, राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, फायनान्स डव्हायझर सपना चिट्टे, डॉ. विजया महाजन, स्त्रीरोगतज्ञ डॉ. गौरी कहाते, डॉ. समन खान-तांबोळी, युवा प्रतिनिधी साक्षी सर्वगोड, ऐश्वर्या सावंत, डॉ. सोनाक्षी टेकाडे, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, विभागीय महिलाअध्यक्ष माया पाटील, जिल्हाध्यक्ष देशभूषण वसाळे, साईबाबा प्रशाला मुख्याध्यापक तिपन्ना कोळी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. अमित किटुकले म्हणाले की, हा प्रकल्प नोव्हेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यरत राहणार असून सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ४८ पूरग्रस्तगावांमध्ये मिनिमम इनिशल सर्विस ऑफ पॅकेज अंतर्गत प्रजननक्षम जोडप्याना कुटुंब नियोजन साधणांचे वाटप, सुरक्षित गर्भपात, गरोदर व स्तनदा माता तपासणी, गर्भाशय व स्तानाची कॅन्सर तपासणी, एच.आय. व्ही तपासणी व समुपदेशन, लिंगभेद अन्याय व अत्याचार समुपदेशन व संदर्भ सेवा, वंधत्व निवारण, स्त्री पुरुष लैंगिक आजारावर उपचार, हिमोग्लोबिन, शुगर, व्ही. डी. आर. एल. तपासणी व सर्वसामान्य तपासणी व औषधोपचार आदी सेवा दिल्या जाणार आहेत.

डॉ. संतोष नवले आपल्या मनोगतात म्हणाले की, सोलापूर जिल्हापरिषद आरोग्यविभाग व मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी तत्पर असेल व फॅमिली प्लँनिंगला शिबिराच्या आयोजनास स्थानिक पातळीवर सर्वतोपरी मदत करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी सोलापूर जिल्हापरिषद आरोग्यविभाग, जिल्हा शल्यचिक्तिसक कार्यालय सोलापूर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूर व भारतीय जैन संघटना मिळून काम कारणार आहेत अशी माहिती केतन शहा यांनी दिली. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूरचे प्रतिनिधी तथा अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी सलापूर जिल्ह्यात उद्भवलेल्या पूर परिस्थितीत त्यांनी बचावकार्यात उल्लेखनीय कार्य केले. अपदामित्र व राज्यातील पहिली अपदाम हिलासखी बचाव टीम तयार करून पूरपरस्थितीत अनेकांचे प्राण वाचविण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल मानपत्र, शाल, बुके व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या वतीने त्यांच्या सहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई यांनी स्वीकारला तर मानपत्र वाचन रामचंद्र वाघमारे यांनी केले.

या कार्यक्रमास विविध समाजिक संस्थाचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रमअधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. विजया महाजन यांनी मानले.

# विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास केंद्र कार्यान्वित करावे : प्रा. डॉ. आयशा रंग्रेझ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट :राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उद्योग व्यवसायाचे प्रशिक्षण मिळावे म्हणून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कौशल्य विकास केंद्र कार्यान्वित करावे असे मत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या प्रा डॉ आयेशा रंग्रेझ यांनी व्यक्त केल्या.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील महिला विकास कक्ष आयोजित कार्यक्रम प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा डॉ मनोज कसबे, प्रा.डॉ अमोल शिंदे, प्रा डॉ विठ्ठल वाघमारे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल कक्ष आयोजित कार्यक्रम**

पुढे त्या म्हणाल्या की, प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात लोकसंख्येच्या प्रमाणात कौशल्य प्राप्त कारागिर खूपच कमी आहेत त्यामुळे महाविद्यालयातच विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षण मिळाले तर त्यांना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगाराची संधी मिळणार आहे, म्हणून महाविद्यालय व्यवस्थापन परिषदेने कौशल्य विकासाची केंद्रे सुरू करावीत.

**विद्यार्थिनींना कौशल्याभिमुख शिक्षण द्यावे**

**विद्यार्थ्यांबरोबर विद्यार्थिनींना देखील स्वावलंबी होण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने ब्युटी पार्लर, फॅशन डिझाईन, फूड प्रोसेसिंग, ड्रायव्हिंग, प्लंबिंग, टायपिंग आदी कौशल्याभिमुख प्रशिक्षण देऊन सक्षम केले पाहिजे असे मत डॉ आयेशा रंग्रेझ यांनी व्यक्त केले.**

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यवस्थापन परिषद कटिबद्ध असते, महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र सुरू करून विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे गरजेचे आहे हे आम्हास मान्य आहे, परंतु त्यासाठी विद्यापीठाने देखील शासकीय योजना अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयापर्यंत पोचविण्याची जबाबदारी घेतली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य एस आर लोखंडे यांनी केले आभार प्रा मनीषा शिंदे यांनी मानले कार्यक्रमास प्रा हर्षदा गायकवाड,प्रा प्राची गणाचारी उपस्थित होते.

**नगर परिषद निवडणूक क्षेत्रीय अधिकारी तसेच एसएसटी, व्हीएसटी. एफएसटी पथकाच्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण यशस्वी पार पडले**

# निवडणूक क्षेत्रीय अधिकारी यांनी यशस्वीरीत्या जबाबदारी पार पाडा : प्रा.संजय खडसे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मा. राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद निवडणूक २०२५ चा कार्यक्रम दि. ४ नोव्हेंबर २०२५ ला जाहिर केला आहे, त्याअनुषंगाने आज दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरपरिषद कार्यालय सिंदखेडराजा येथे SST, VST, FST पथकातील सर्व कर्मचारी यांची उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

SST पथकातील सर्व कर्मचाऱ्यांनी वाहनाची तपासणी ही योग्यरीत्या करावी, तपासणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी सर्व वाहनांची नंबर लिहून घ्यावेत तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी बॅरिकेट लावून वाहनांची तपासणी योग्यरीत्या कशी पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे, अश्या प्रकारच्या सूचना प्रा. खडसे यांनी दिल्या.

FST पथकाने प्राप्त झालेल्या तक्रारींची तक्रार स्थळी जाऊन चौकशी करावी आणि योग्य ती कारवाई करण्याची सूचना सुद्धा प्रा. खडसे यांनी दिल्या आहेत. SST पथक हे दिनांक ११ नोव्हेंबर पासून कार्यान्वित होणार आहे तरी या पथकातील सर्व अधिकाऱ्यांनी / कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडावी अशा सूचना त्यांना देण्यात आल्या.

सर्व झोनल अधिकाऱ्यांनी सर्व मतदान केंद्राची पाहणी करून घ्यावी, पाहणीवेळी काही मतदान केंद्र जर संवेदनशील आढळली तर तसा अहवाल तयार करून तो सादर करायच्या सूचना दिल्या आहेत. पोलीस अधिकाऱ्यांनी संवेदनशील भागातील मतदान केंद्राना सुरक्षा पुरवण्यासाठीची योग्य ती कार्यवाही करावी याबद्दल प्रा. खडसे यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. खडसे यांनी निवडणुकी संदर्भात काही मार्गदर्शक सूचना सर्व कर्मचाऱ्यांना सांगितल्या, तसेच नगर परिषद निवडणुकीला प्राधान्य देऊन सर्व प्रक्रिया यशस्वी रित्या पार पाडण्याचे आवाहन केले...

आजच्या सभेला तहसीलदार सिंदखेडराजा अजित दिवटे, मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. आशिष बोबडे, नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे तसेच सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# रस्ता सुरक्षा समितीची राज्य शासनाला सूचना अपघात रोखण्यासाठी समन्वयाने कृती करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश तथा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष अभय सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील रस्ता सुरक्षा उपाययोजनांबाबत उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार तसेच गृह, परिवहन, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम, सार्वजनिक आरोग्य आणि शालेय शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. समितीचे अध्यक्ष अभय सप्रे हे दि. ९ ते १४ नोव्हेंबरदरम्यान मुंबई-पुणे दौऱ्यावर असून, रस्ता सुरक्षा सुधारणा आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत रस्ते अपघात रोखण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच ब्लॅक स्पॉट्स दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी सूचना करण्यात आली. केंद्र सरकारच्या आयआरएडी पोर्टलचा प्रभावी वापर, आयटीएमएस, एटीएस आणि एडीटीटी प्रकल्पांची गतिमान अंमलबजावणी तसेच हेल्मेटचा अनिवार्य वापर या विषयांवरही समितीने भर दिला. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनीही दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक असल्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच जिल्हास्तरावर नियमितपणे रस्ता सुरक्षा समित्यांच्या बैठका घेऊन अपघात प्रतिबंधक उपाययोजना राबविण्याचे निर्देशही देण्यात आले. रस्ता सुरक्षा नियमांची प्रभावी अंमलबजावणी करून राज्यातील अपघात आणि अपघाती मृत्यू रोखण्याचे उद्दिष्ट असल्याचे यावेळी सांगण्यात आले.